**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३**

**नि.फौ.ख.क्र. २१/२०२३**
महाराष्ट्र शासन वि. देविदास
**नि.क्र. ४२**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | धर्मराज बापुराव कोहळे, |
| वय | – | ५२ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणार | – | पिठोरी, ता. नरखेड, जि. नागपूर |

**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. यु. मिरचे यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–**

दि. ०८/१२/२०२१ रोजी मला पोलीसांनी पंचनाम्यासाठी कोणतेही सुचनापत्र दिले नव्हते. आता मला दि. ०८/१२/२०२१ रोजीचे सुचनापत्र दाखविण्यात येत आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. त्यावरती माझी सही नाही. त्यावरती कोणी माझ्या नावाने सही केली मला माहिती नाही. आता मला दि. ०८/१२/२०२१ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात येत आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. त्यावरती माझी सही नाही. त्यावरती कोणी सही केली मला माहिती नाही. पोलीसांनी माझ्या समक्ष कोणताही पंचनामा तयार केला नाही. मी आरोपींना ओळखत नाही.

**(सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्यमान सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सदर साक्षीदार उलटतपासणीची परवानगी मागितली. साक्षीदारास भारतीय पुरावा कायदाचे कलम १५४ प्रमाणे उलटतपासणीची परवानगी देण्यात येत ).**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८/१२/२०२२ रोजी पोलीसांनी मला पोलीसांनी फिर्यादी राजेंद्र बालपांडे याच्या कामासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला होता. पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा वाचून दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी पोलीसांनी माझे फोटो सुध्दा काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा वाचून दाखविल्यानंतर मी त्यावरती सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी १२:३० ते १३:३० च्या दरम्यान पंचनामा केले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष

पंचनामा केल्यामुळे पंचनाम्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहिती आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एन. नारनवरे यांच्यामार्फत उलटपासः–**

३. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहिता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फक्त अंगठा करतो. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा किती वाजता सुरु झाले आणि किती वाजता संपले यासाठी मी घडी बघितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या समक्ष कोणतेही नकाशा तयार केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचून दाखविले नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की काय वाचून दाखविले हे माझ्या लक्षात नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी राजेंद्र सोबत माझे चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, राजेंद्रने पंचनामा मला माझ्या घरी दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, मी राजाराम मनसुजी सलामे यास ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्या वेळी तो शेतात नव्हता.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

माझे समक्ष,

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.12.18 15:59:28 -0500

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

**दिनांकः १८/१२/२०२५.**

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.12.18 15:59:22 -0500

(रोहन विजयकुमार थाईल)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

**दिनांकः १८/१२/२०२५**

**माझे सरतपासणी व उलटतपासणी चे पान नं. 01 ते 02 मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे. व Explanation V, Paragraph No. 16, Chapter VI of Criminal Manual प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.**

साक्षीदाराची सही
(धर्मराज बापुराव कोहळे)

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता
(व्ही. यु. मिरचे)